REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 4 | JANUARY - 2020

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील स्त्रियांचा दर्जा”

**वामन रामराव वैद्य**
**सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.**

## प्रस्तावना :-



छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात स्त्रियांना फार मानाचा दर्जा दिला होता. छत्रपती तर स्वतः आपली पत्नी सोडून सर्वांना मातेसमान मानत असंत. प्रजेचे पालन पोषण आपल्या मुला प्रमाणे करीत असत. त्यामध्ये स्त्रियांना अजिबात त्रास होणार नाही याची काळजी शिवाजी महाराज घेत असत. म्हणून शिवरायांच्या कार्याला जनता अंतकरणातून साथ देत होती. स्वराज्याच्या कार्यासाठी लढताना प्राण गेला तरी चालेल अशी प्राणार्पण करण्याची भावना जनतेत निर्माण झाली होती. सामान्यातले सामान्य माणसे शिवरायांच्या बरोबरीने लढत होते. कारण शिवाजीराजे करतात ते आपले कार्य आहे असे त्यांना वाटत असे. त्याला एकच कारण होते ते म्हणजे शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन होय. अनेक राजे महाराजे होऊन गेले पण स्त्रीयावर होणाऱ्या जोर ,जुलूमाला काही अंत राहिला नव्हता. सरंजामदार मुजोर झाले होते. या सरंजाम दाराच्या जुलूमाला तर सीमाच राहीली नव्हती. सरंजामदार शाहीच्या काळात स्त्रियांच्या अब्रूला काही किंमत नव्हती. आणि सामान्य रयतेच्या लेकीसुना म्हणजे राजेरजवाडे, राजपुत्रा पासून ते सरदार, वतनदार, जमीनदार या सर्वांच्या दृष्टीने त्या उपभोगाच्या वस्तू होत्या. दिवसाढवळ्या त्यांची अब्रू लुटली जात असे. आणि त्यांच्या विरुद्ध कुणाकडेही दाद मागता येत नव्हती. ज्याच्याकडे दाद मागायची तेच अब्रू लुटणारे होते.

जिजामातेने बाल शिवाजीला सोबत घेऊन स्वराज्याचे तोरण बांधले आणि शिवकाळ सुरू झाला. आणि रयत आश्चर्यचकित झाली. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बातमी पोहोचली की गरीब शेतकऱ्यांच्या तरुण पोरीला उचलून नेऊन तिच्यावर बलात्कार करणाऱ्या रांझ्याच्या पाटलाचा शिवाजीराजांनी चौरंगा केला म्हणजे त्याचे हात-पाय तोडले होते. वतनदार, मुजोर, पाटलाला शिक्षा झाल्यामुळे रयत शिवरायावर खुश झाली. रयतेच्या अब्रू रक्षणाचे कार्य शिवराय करत असतील तर त्यासाठी रयत ही प्राण देण्यासही तयार होती. छत्रपती शिवरायांनी सैनिकांना सक्त ताकीद दिली होती की लढाईत किंवा लुटीत हिंदू किंवा मुस्लिम अशा कोणत्याही धर्माच्या स्त्रीया हाती सापडल्या तर त्यांना त्रास किंवा त्यांचा छळ करू नये. त्याकाळात हिंदू व मुसलमान राजेरजवाडे, इनामदार, सरदार लढाईवर जाताना जनानखाना, बटकीनी, कुणबीणी व कलावंतीन बरोबर नेत असत. तसेच पर मुलखातील स्त्रियांना बटकीण बनण्याचा आणि त्यांना भ्रष्ट करण्याचा ठेका त्यांच्याकडे होता. छत्रपती शिवाजी महाराज हे स्त्रियांना पूज्य मानणारे, परस्त्रीला मातेसमान मानणारे होते. संत तुकारामांच्या शिकवणी प्रमाणे “परस्त्रीया सदा बहिणी माया” याप्रमाणे प्रत्यक्ष अमलात आणून तसे वागणारे शिवराय होते. असे चारित्र्यसंपन्न असणाऱ्या शिवाजी राजांनी आपल्या

सैनिकांना मोहिमेवर जाताना कोणीही बटकीणी, कुणबीणी किंवा कलावंतीन बरोबर नेउ नये. कोणाही स्त्रीला बटकीण बनविता कामा नये. परमुलखात कोणत्याही स्त्री भ्रष्ट करता कामा नये.

**"कल्याणच्या सुभेदाराची सून"**

**छत्रपती शिवाजी राजे परस्त्रीकडे कोणत्या नजरेने पाहत होते हे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेच्या प्रकरणावरून दिसून येते.संत श्री तुकाराम** महाराजांच्या मताप्रमाणे

"पराविया नारी रखुमाई समान ।
हे गेले नेमून ठायीचिये " ।

आबाजी सोनदेव ह्या शिवाजी महाराजांच्या सरदाराने कल्याण काबीज केले. कल्याणचा विजापूरी सरदार मुल्लाना महमद खजिना घेऊन विजापूरला गेला. पण त्याने आपले कुटुंब कल्याणला ठेवले. कारण सुभेदाराला माहीत होते की शिवाजीचे सैनिक आपल्या कुटुंबाला हातही लावणार नाहीत. कोणत्याही धर्माच्या स्त्रीस हात लावता कामा नाही अशी सक्त ताकीद शिवाजीने आपल्या सैनिकांना दिली होती त्यामुळे कोणी गैरकृत्य करणार नाही, अशी सुभेदाराची ठाम समजूत होती. या विश्वासावर तो कल्याण सोडून गेला. आबाजी सोनदेवाने सुभेदाराची तरुण सुंदर सून पाहिली आणि तिला घेऊन तो शिवाजी महाराजांना नजर करण्यास निघाला. शिवरायांच्या आज्ञेचा भंग करणारी ही घटना २४ ऑक्टोबर १६५७ रोजी घडली.

आज्ञेची अवहेलना म्हणजे प्रत्यक्ष शिवरायांचा अपमान करणारा हा आबाजी सोनदेव कोणते कपटकारस्थान डोक्यात घेऊन चालला होता. शिवराय आपणास शिक्षा करतील ही भीती त्यास नव्हती. त्याचे काय कपट कारस्थान होते. जेंव्हा जेंव्हा एखादा माणूस बहुजनांच्या हितासाठी, कल्याणासाठी झटतो. तेंव्हा त्या माणसाला बदनाम करुन खाली खेचणे हा प्रतिगामी वाद्यांचा विचार असतो कारण त्यांना बहुजनांची प्रगती पाहवली जात नाही ते लोक त्या बहुजन समाज घातकी प्रवृत्ती त्या माणसाचे बहुजन कल्याणाचे सद्विचार कसे नष्ट होतील आणि तो बहुजना पासून कसा दूर जाईल याचा सतत प्रयत्न करीतअसतात. हे आपणास इतिहासावरून दिसून येईल हाच प्रयत्न आबाजी सोनदेवाचा होता असेच म्हणावे लागेल.

ऐन तारुण्यातला शिवाजी तसेच तरुण सुंदर स्त्री हे पाहता कोण भाळणार नाही. त्यांचे सूत जमले तर आपलेही भजन जमेल आणि वासनेच्या आहारी गेलेल्या स्त्रीलंपट राजांची आपल्यावर खास मर्जी राहील आणि कदाचित पुढे मागे राजांचा खरा सूत्रधार आपण राहू या हेतूनेच आबाजी सोनदेवाने हे पाऊल उचलले होते. शिवाय शिक्षेची भीती बाळगण्याचे त्याला काही कारण नव्हते कारण शिवरायांना शास्त्राप्रमाणे ब्राह्मणास शिक्षा करण्याचा अधिकार नव्हता. राज्याभिषेका मुळे ब्राह्मणांनाही शिक्षा करण्याचा अधिकार शिवाजीला मिळणार होता. म्हणूनच त्यांना राज्याभिषेकासाठी सर्व ब्राह्मणांकडून विरोध झाला होता. व महाराष्ट्रातील एकाही ब्राह्मण पुरोहिताने यांचा राज्याभिषेक केला नाही.

याच बहुजन समाज घातकी वृत्तीने शिवरायांचे गुरु संत तुकाराम महाराजांवर हा प्रयोग केला. संत तुकारामांनी बहुजनांना जागृत करून नवी दिशा दिली तुकारामांच्या साध्याभोळ्या सहज शिकवणी कडे सामान्य लोकांचे लक्ष आकर्षिले जात होते. हे मंबाजी भटाला सहन झाले नाही. त्याने तुकारामाचे अभंग इंद्रायणी मध्ये बुडवून टाकले. तरी सुद्धा जनमानसात ती तरुण राहिली. तुकारामांचा वाढता प्रभाव पाहून मंबाजी भटाने एका स्त्रीला तुकारामाकडे पाठविले . तुकारामाच्या झोपडीत आलेल्या त्या स्त्रीला तुकाराम महाराज म्हणतात

**"जाई हो माते न करी सायास ।**
**आम्ही विष्णू दास तैसे नव्हे" ।**

अगदी हीच आदर्श नैतिकता गुरु प्रमाणे शिवाजीने दाखविली.आबाजी सोनदेवाने नजर केलेल्या त्या सुभेदाराच्या सुनेला पाहताच महाराज म्हणतात "**अशीच आमची आई सुंदर असती तर आम्ही किती सुंदर झालो असतो".**

शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला साडीचोळी, अलंकार देऊन सन्मानाने परत पाठविले.

संत श्री तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांच्यात वैचारिक समानता दिसून येते. म्हणूनच ते गुरुशिष्य शोभतात. या घटनेने सामान्य जनतेवर फार मोठा प्रभाव पडला, मुस्लिम समाजावर या घटनेची कोणती प्रतिक्रिया उमटली हे पाहणे उचित ठरेल. सय्यद अमीन सारखा मुस्लिम इतिहास लेखक.**"महापुरुष"** या पुस्तकातील पान नंबर ४० वर म्हणतो कि शिवाजी महाराजांच्या या उदात्त वर्तनाची, चारित्र्यसंपन्नतेची सर्वत्र वाहं ! वाह ! होउ लागली. मुस्लिमांना तर त्यांच्याबद्दल खूपच आदर वाटू लागला शत्रुपक्षातील स्त्रीला आपल्या जनानखान्यात, अंतःपुरात नेण्याची त्याकाळची प्रथा पण महाराजांनी ही प्रथा झुगारून एक महान आदर्श निर्माण केला.

## गोळेवाडीकरांची सुन

आबाजी सोनदेवाच्या अगोदर असाच एक प्रयत्न झाल्याचे दिसून येते. वाई नजीक गोळेवाडी नावाचे गाव असून तेथे गोळ्यांनी बंड केले. त्या बंडात गोळ्यांची सून प्रतापगडाच्या पायथ्याशी लपलेली आढळली. प्रतापगडाच्या एका ब्राह्मण सुभेदाराने पकडून शिवाजीराजाला नजर केले. याचाही उद्देश मंबाजी, आबाजी सारखाच असावा असे वाटते. जेंव्हा त्याने त्या स्त्रीला शिवराया समोर आणले तेंव्हा शिवराय अतिशय संतापले आणि निक्सून ताकीद दिली की तू आत्ताच्या आत्ता कुटुंबासह काशीला निघून जा पुन्हा या देशी पाहिले असता तुझे पारिपत्य करण्यात येईल. एक शिपाई घेऊन तो सुभेदार ब्राह्मण तेंव्हाच राज्या बाहेर हाकलून लावला. स्वतः शिवाजी महाराज स्त्रियांचा किती आदर करीत होते हे या घटनेवरून दिसून येते.

## शत्रूची स्त्री झाली म्हणून काय झाले?

एखाद्या स्त्रीवर नीच कृत्य करण्याचे शिवकाळात काय परिणाम होत होते. याचे एक उत्तम उदाहरण आपणास एक्याण्णव कलमी बखरीतून वाचायला मिळते ती असे..

बेलवाडी हा भुईकोट किल्ला असून तेथील ठाणेदार जातीने प्रभू होता बेलवाडीला दादाजी रघुनाथ या शिवरायांच्या सरदाराने वेढा घातला युद्धात ठाणेदार मारला गेला. पण त्यांच्या पत्नीने सावित्रीबाई ने शुरूपणे तो किल्ला चांगला महिनाभर लढविला शेवटी दादाजी रघुनाथाने तो किल्ला सर केला. ठाणेदारीण सावित्रीबाई हिच्यावर त्यावेळी सखोजी गायकवाड या सरदाराने बलात्कार केला. ही बातमी शिवरायांना कळाली तेंव्हा ते खूप संतापले. सखोजीला महाराजा पुढे उभे करण्यात आले. महाराज म्हणाले शत्रूची स्त्री झाली म्हणून काय झाले तिला सन्मानाने वागविले पाहिजे. स्त्रीची अब्रू लुटणे हे महापाप आहे. या गुन्ह्याबद्दल तुझे डोळे काढण्याचा मी हुकूम देत आहे. आणि तात्काळ त्या हुकुमाची अंमलबजावणी झाली.

## माहूरची रायबागन.

कल्याण सुभेदाराची सून, गोळेवाडी कराची सून किंवा बेलवाडी ची ठाणेदारीण खरंतर ह्या शत्रूंच्या स्त्रिया, शत्रूंच्या स्त्रियांवर जबरदस्ती अन्याय पावित्र्य भंग ह्या गोष्टी होणारच पण स्त्री शत्रूची असो की आपली हिंदू असो की मुसलमान ती फक्त स्त्रीच आहे आणि तिचा आदर करुन तिला सन्मानाने वागविले पाहिजे. अशी शिकवण शिवाजी महाराजांनी दिली होती. महाराजांविरुद्ध शाहिस्तेखानाला मिळून महाराजावर हल्ला करणारी शत्रुपक्षाकडील मोगला कडील माहूरची रायबागन उदाराम देशमुख यांची विधवा पत्नी हिच्याशी महाराजांनी माणुसकी धर्माला अनुसरून उचित व्यवहार केल्याचे दिसून येते यासंबंधी हकीकत अशी आहे की.

रायबागन कुमकेस आणविली. तो पेणचे मार्गे येणार हे वर्तमान महाराजांस जाहीर झाले. त्यावर उमरखेड मार्गावर ५००० सैनिक ठेवून मार्ग बंद केला. उमरखेड मार्गे रायबागन येत आहे तिला बुडविणे. तुमची सर्फराजी होईल.तो रायबागन उंबरखेडास आली. पुढे सर्वांनी

 VOLUME - 9 | ISSUE - 4 | JANUARY- 2020

मिळून भोवती वनवा लावून लष्कर सर्व बुडविले रायबागन धरून आणली. ती बाई माणूस काय मारावी म्हणून वस्त्रे जवाहर देऊन औरंगाबादेस आणून सोडले. शत्रूला भीतीने थरथर  कापायला लावणारा शिवाजी जेंव्हा शत्रूला आपल्या कैदेत ठेवतो. तेव्हा त्या कैद्याची मानसिक स्थिती काय असेल याचा अंदाज घेणे कठीण आणि त्यावेळी हा शिवाजी शत्रूला वस्त्रे जवाहर देऊन सन्मानाने पाठवतो. त्यावेळी त्याच्या मानसिक स्थितीचा अंदाज घेणे महाकठीण आहे.

शिवाजी चे कार्य हे मुलत: परिवर्तन वाद्याचे होते. तत्कालीन समाजात एकंदरीत स्त्रीविषयक असलेला अनादर, तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची समाजाची स्थिती, शारीरिक आणि मानसिक शोषण ग्रस्त असलेल्या स्त्रिया, सतत शारीरिक आणि मानसिक अत्याचाराच्या शिकार होत होत्या. त्यातही जातवार प्रमाण कमी अधिक होते. अशा काळात शिवाजीने मांडलेल्या स्त्रीविषयक विचार हा प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधात असल्याचे दिसून येते. त्यामुळे शिवाजी आमच्या स्त्रियांच्या अब्रूचे रक्षण करतो यासाठी आम्ही मरायलाही तयार राहू ,  ही आत्माहुतीची भावना सामान्य जनतेमध्ये वाढीस लागली. त्याकाळी लढणारे सैनिक दौलतीसाठी, जहागिरी साठी  लढत. शिवरायांनी तयार केलेल्या त्यामागील भावना ही प्रखर देशभक्ती ची राष्ट्रवादाची होती. कारण शिवरायांचे सैनिक हे स्वराज्यासाठी लढत होते. असे आपणास दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ


१) शेगावकर भोसले बखर

२) मा.म.देशमुख – शिवशाही

३) कुलकर्णी भीमराव (संपा) सभासद बखर

४) विजय देशमुख-शककर्ते शिवराय.

५) पुरंदरे दप्तर.